महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ७९ वा | दिनांक : २०/१२/२०२४ | वार : शुक्रवार

## कर्नाटकच्या महिला मंत्री म्हणाल्या- भाजप आमदाराने 'वेश्या' म्हटले



**बंगळुरू :** कर्नाटकच्या महिला आणि बालविकास मंत्री लक्ष्मी हेब्बाळकर यांनी गुरुवारी भाजप आमदार सीटी रवी यांच्यावर अपमानास्पद शब्द वापरल्याचा आरोप केला. त्यांनी सांगितले की, बेळगावी विधानपरिषदेत रवी यांनी त्यांना 'वेश्या' म्हटले.

काँग्रेस सदस्यांसह लक्ष्मी यांनी विधान परिषदेचे सभापती बसवराज होरत्ती यांच्याकडे तक्रार करून कारवाईची मागणी केली आहे. त्याचवेळी या घटनेनंतर हेब्बाळकर यांच्या समर्थकांनी रवी यांच्या गाडीला घेराव घालून निदर्शने केली.

भाजपचे आमदार रवी यांनी लक्ष्मी हेब्बाळकर यांच्या आरोपांचे खंडन करत आपण असे काहीही बोलले नसल्याचे सांगितले. खोटे आरोप करून काँग्रेस त्यांना गोवते आहे. त्यांनी कधीही महिला मंत्र्यासाठी असे शब्द वापरलेले नाहीत.

गुरुवारी कर्नाटक विधानसभेत काँग्रेसचे आमदार अमित शहा यांच्या संसदेत केलेल्या वक्तव्याविरोधात निदर्शने करत होते. यादरम्यान भाजप आमदार रवी यांनी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना 'ड्रग ॲडिक्ट' म्हटले. यानंतर हेब्बाळकर यांनी आरडाओरड करून रवी यांना त्यांनी गाडीने चिरडून एका व्यक्तीला ठार केल्याचे सांगितले. यामुळे संतापलेल्या रवी यांनी हेब्बाळकर यांना अनेकवेळा वेश्या म्हटले.

## संतोष देशमुख हत्येची चौकशी सीआयडी पोलिस महासंचालक करणार

**बीड :** जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून बेदम मारहाण करत त्यांची हत्या करण्यात आली आहे. या घटनेमुळे राज्यभरात एकच खळबळ उडाली आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणी आता सीआयडीचे पोलिस महासंचालकांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात येणार आहे. या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस शुक्रवारी सकाळी सविस्तर निवेदन विधानसभेत सादर करणार असल्याची माहिती आहे.

संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी आता वरिष्ठ पातळीवर चौकशी केली जाणार आहे. तसेच या प्रकरणी कोणते अधिकारी तपास करणार यावर गृहविभागाकडून निर्णय घेण्यात येणार आहे. इतकेच नव्हे तर या तपासाची कार्यक्षमता काय असणार हे देखील आता गृह विभागच ठरवणार आहे.

९ डिसेंबर रोजी सरपंच संतोष देशमुख यांची हत्या करण्यात आली होती. या प्रकरणी आतापर्यंत ५ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच दोन आरोपी फरार आहेत. पवनचक्की खंडणी वादातून ही हत्या झाली असल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेतील मुख्य आरोपी विष्णू चाटे आणि सुदर्शन घुले हे राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवारांच्या पक्षाशी संबंधित आहेत. तसेच वाल्मिक कराड यांच्यावर देखील या हत्येचा आरोप केला जात असून कराड हे मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय आहेत.

दरम्यान, संतोष देशमुख हत्या प्रकरणावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सगळ्या वसुलबाजांवर कारवाई केल्याशिवाय राहणार नाही, असा इशाराच दिला आहे. त्यामुळे आता या प्रकरणी लवकरात लवकर तपास पूर्ण करत आरोपींना शिक्षा केली जाईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## मनुस्मृतीला मानणाऱ्या भाजपचा संविधान विरोधी चेहरा उघडा पडला : आमदार ज्योती गायकवाड

**नागपूर :** भाजप युवा मोर्चाचे कार्यकर्ते मुंबईतील काँग्रेसच्या कार्यालयात शिरले. यावेळी कार्यकर्त्यांकडून कार्यालयात तोडफोड करण्याचा प्रयत्न झाला. तसेच सोनिया गांधी, राहुल गांधी, मल्लिकार्जुन खरगे, प्रियांका गांधी, वर्षा गायकवाड यांच्या फोटोंवर काळी शाही फेकण्यात आली. पोलिसांनी वेळीच मध्यस्थी करून जमाव पांगवण्याचा प्रयत्न केला. यावर आता कॉंग्रेस आमदार ज्योती गायकवाड यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

ज्योती गायकवाड म्हणाल्या, मनुस्मृतीला मानणाऱ्या आरएसएस-भाजपचा संविधान विरोधी, आंबेडकर विरोधी आणि महिला विरोधी चेहरा आज पुन्हा एकदा उघड झाला आहे. महामानव, भारतरत्न परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान केल्याबद्दल देशाची माफी मागण्याऐवजी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या इशाऱ्यावर भाजपच्या गुंडांनी आज एक कट्टर आंबेडकरवादी, एक महिला, एक दलित असलेल्या मुंबई कॉंग्रेसच्या अध्यक्षा वर्षा गायकवाड ताई यांच्या कार्यालयावर भ्याड हल्ला केला. हा हल्ला सुनियोजित आणि भाजपच्या श्रेष्ठींच्या सांगण्यावरून केला गेला असल्याचा आरोप ज्योती गायकवाड यांनी केला आहे.

पुढे बोलताना ज्योती गायकवाड म्हणाल्या, यांच्या गुंडशाहीला काँग्रेसचा कार्यकर्ता भीक घालत नाही. आंबेडकरी विचार आणि संविधानाची कास धरून आम्ही यांच्या मनुवादी प्रवृत्तीला पुन्हा पराभूत करू. लोकांचे लक्ष विचलीत करण्याचा यांनी कितीही प्रयत्न केला तरी बाबासाहेबांचा अपमान देश सहन करणार नाही. अमित शहा यांना माफी मागावीच लागेल.

दरम्यान, कॉंग्रेस खासदार वर्षा गायकवाड यांनी देखील भाजपवर हल्लाबोल केला आहे. वर्षा गायकवाड म्हणाल्या, महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव ऐकताच का कोणास ठाऊक पण मनुवादी आरएसएस-भाजपाने नेहमी हेच केले... हल्ले आणि तोडफोड. अमित शाह ने देशाचे उद्धारक बाबासाहेब आणि आंबेडकरी चळवळीचे अपमान केले आहे. आता त्यांना वाचवण्यासाठी आणि लोकांचे लक्ष विचलित करण्यासाठी भाजप गुंडगिरीवर आली असल्याचा आरोप वर्षा गायकवाड यांनी केला आहे.

वर्षा गायकवाड म्हणाल्या, भाजपच्या ५० गुंडांनी आमच्या कॉंग्रेसच्या कार्यालयावर हल्ला केला. खुर्च्या फेकल्या, पोस्टर्स फाडले, आणि मालमत्तेची तोडफोड केली. ही गुंडशाही नाही तर काय आहे. या भ्याड हल्ल्याच्या मी तीव्र निषेध करते. पण यांच्या गुंडगिरीला आम्ही भिक घालत नाही. आम्ही कॉंग्रेसचे बब्बरशेर कार्यकर्ते आहोत. आम्ही लढू, भिडू आणि जिंकू. आम्ही याविरोधात कायदेशीर कारवाई करणार आहोत.

## तुम्ही मराठी माणसं घाण आहात म्हणत अधिकाऱ्याने गुंडांना बोलवत केली मारहाण



**कल्याण :** योगीधाम परिसरातील अजमेरा हाईट्स या हायप्रोफाईल सोसायटीत किरकोळ कारणावरून एमटीडीसीमधील अधिकाऱ्याने गुंडांना बोलावून मराठी कुटुंबावर हल्ला केला आहे. तुम्ही मराठी माणसं घाण आहात. तुम्ही मटण मच्छी खातात. तुमच्या सारखे मराठी माझ्याकडे झाडू मारायला आहेत, असे म्हणत मारहाण करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.

एमटीडीसी येथे अकाऊंट मॅनेजर पदावर कार्यरत अधिकाऱ्याने गुंडांना बोलावून ही मारहाण केली आहे. या घटनेत तीन जण जखमी झाले असून मुंबई येथील रुग्णालयात त्यांच्यावर सध्या उपचार सुरू आहेत. हल्ला करणाऱ्याचे नाव अखिलेश शुक्ला असे आहे. तर मारहाण झालेल्या मराठी कुटुंबाचे कळवीकट्टे असे नाव आहे. अत्यंत क्षुल्लक कारणावरून शुक्ला यांनी गुंडांना बोलावून मारहाण केली आहे.

अखिलेश शुक्ला यांच्या पत्नी गीता या घराबाहेर देवपूजा करून धूप लावत असत. वर्षा कळवीकट्टे यांच्या घरात हा धूर जात असल्याने व त्यांच्या तीन वर्षांच्या बाळाला धुराचा त्रास होत असल्याने तसेच त्यांच्या घरातील वयोवृद्ध आई यांना दम लागत असल्याने धूप घरात लावण्यास सांगितले. मात्र गीता यांनी वाद घालण्यास सुरुवात केली. हा वाद सुरू असताना बाजूला राहणारे अभिजीत देशमुख आणि त्यांचे भाऊ धीरज देशमुख यांनी मध्यस्थी करत वाद सोडवण्याचा प्रयत्न केला. याचा राग शुक्ला याला आला आणि शुक्लाने १० ते १५ गुंडांना बोलावून देशमुख बंधूंना लोखंडी रॉडने बेदम मारहाण केली.

या मारहाणीत अभिजीत देशमुख हे गंभीर जखमी झाले असून त्यांना मुंबईच्या सायन रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. शुक्ला हे सोसायटीमधील इतर मराठी माणसांना देखील त्रास देत असल्याच्या अनेक तक्रारी समोर आल्या आहेत. या घटनेनंतर शुक्लावर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २० डिसेंबर २०२४


## छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने गृहमंत्री अमित शहा यांच्या बेताल वक्तव्याबद्दल राजीनाम्याची मागणी

**छत्रपती संभाजीनगर :** पददलितांचा आवाज आणि संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल केंद्रिय गृहमंत्री अमित शहा यांनी लोकसभेमध्ये केलेल्या अपमानजक विधानाचा निषेध करण्यासाठी छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शहर जिल्हा काँग्रेस कमिटी तर्फे शहर जिल्हाध्यक्ष मा. शेख युसूफ यांच्या नेतृत्वाखाली विद्यापीठ गेट डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ जोरदार आंदोलन करण्यात आले व अमित शहा यांच्या विरोधात मोठ्या प्रमाणात घोषणा देऊन राजीनाम्याची मागणी करण्यात आली.

यावेळी शहर जिल्हाध्यक्ष मा.शेख युसुफ, डॉ. जफर खान, डॉ. पवन डोंगरे, निलेश आंबेवाडीकर, इंजि. विशाल बन्सवाल, कैसर बाबा, संतोषकुमार दिडवाले, रमाकांत गायकवाड, सोहेल मसरूर खान, इद्रिस खान, अनिता भंडारी, शिला मगरे, शेख रईस, अखेफ रजवी, शेख अथर, योगेश बहादुरे, प्रमोद सदाशिवे, मूहसिर अन्सारी, निखिल गायकवाड, कृष्णा खरात, विशाल मोहिते, दत्ता चव्हाण, बळीराम खरात, सतीश जमधाडे, गौरव वानखेडे, सुभाष जाधव, आसाराम कनिसे, सय्यद युनूस, योगेश थोरात, सागर साळुंके, इरफान खान, जाफर खान, सय्यद फय्याज, शेख फय्याजोद्दीन, अलंकृत येवतेकर यांच्यासह मोठ्या प्रमाणावर काँग्रेस चे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## चापानेर (ता. कन्नड) येथे जय हिंद फाउंडेशनच्या वतीने आरोग्य शिबिराचे आयोजन



**कन्नड (अक्षय चव्हाण) :** चापानेर येथे जय हिंद फाउंडेशनच्या वतीने बुधवारी (ता.१८) आरोग्य शिबिर, नेत्रतपासणी व रक्तदान शिबिर पार पडले. यावेळी ५५० रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली असून, महालॅब्स अंतर्गत शिबिरात आलेल्या सर्व रुग्णांची रक्त तपासनी करून त्यांना मोफत औषधी देण्यात आली.

यावेळी नेत्रतपासणीमध्ये ३३ रुग्णांना मोतीबिंदूचे निदान निघाले असून, त्यांची २५ डिसेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथील लायन्स आय हॉस्पिटल येथे मोफत शस्त्रक्रिया होणार आहे. तर रक्तदान शिबिरात ३५ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

यावेळी चापानेर येथील आरोग्यवर्धिनी केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. शोएब शेख, डॉ. सायली बागले, प्रयोगशाळा तंत्रज्ञ हर्षदा नलावडे, संजय गायकवाड, माधुरी थोरात, प्रियंका गंगावणे यांच्यासह केंद्रातील आरोग्य सहायक, आशाताई, छत्रपती संभाजीनगर येथील लायन्स आय हॉस्पिटलचे डॉ. गायकवाड यांच्यासह कर्मचारी, आदर्श रक्तपतपेढीचे डॉ. राम डोंगरे, डॉ. अनुराधा नांद्रे यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते.









## आ.संजना जाधव यांनी विधानसभेत मांडल्या तालुक्यातील मागण्या




**कन्नड (अरुण थोरात):** कन्नड सोयगाव विधानसभे च्या आमदार संजनाताई जाधव यांनी पूरवणी मागण्या चर्चे दरम्यान आपल्या मतदारसंघातील उद्योग, कृषी आणि रस्त्यांच्या स्थितीवर नागपूर हिवाळी अधिवेशनाच्या दरम्यान झालेल्या चर्चेत उपस्थितांचे लक्ष वेधले.

मतदारसंघातील उद्योगधंद्याचा विकास करणे आवश्यक असून, मतदारसंघातील एमआयडीसी प्रकल्पासाठी थांबलेली भुसंपादन प्रक्रिया लवकरात लवकर पुन्हा सुरू करावी, अशी मागणी याप्रसंगी केली तसेच, कन्नड सोयगाव मतदारसंघातील रोजगारनिर्मितीच्या दृष्टीने उपाययोजना करण्यात याव्यात असेही सांगितले.

शेतकऱ्यांच्या समस्यांबाबत चर्चा करतांना, रस्त्यांची दुरावस्था मोठी अडचण ठरत असून, शेतकऱ्यांना आपल्या मालाची वाहतूक करण्यासाठी रस्त्यांची तातडीने दुरुस्ती आवश्यक असल्याचा मुद्दा देखील उपस्थित केला. तसेचकन्नड सोयगाव विधानसभा मतदारसंघात नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे ६०,००० हेक्टर क्षेत्र प्रभावित झाले असून, शेतकऱ्यांना मोठे नुकसान सहन करावे लागले आहे.

त्यांच्यासमोर जीवन-मरणाचा प्रश्न उभा आहे, त्यामुळे लवकरात लवकर त्यांना अनुदान आणि नुकसान भरपाई मिळवून देण्याची मागणी त्यानी सभापती महोदयांकडे केली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २० डिसेंबर २०२४


## दिल्लीत आयोजित साहित्य संमेलन अभूतपूर्व ठरेल : प्रतिभाताई पाटील



**पुणे :** सरहद, पुणे आणि अखिल भारतीय साहित्य महामंडळातर्फे दिल्ली येथे आयोजित करण्यात आलेल्या ९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या https://abmssdelhi.org या संकेतस्थळाचे (वेबसाईट) उद्घाटन माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते गुरवारी करण्यात आले. दिल्लीत सुमारे ७० वर्षानंतर होत असलेल्या मराठी साहित्य संमेलनासाठी शुभेच्छा देऊन हे संमेलन अभूतपूर्व ठरेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रतिभाताई पाटील यांच्या ९०व्या वाढदिवसाचे औचित्य साधून 'रायगड' या निवासस्थानी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र साहित्य परिदषेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, डॉ. सतिश देसाई, ॲड. प्रताप परदेशी, शैलेश वाडेकर, अनुज नहार, संतोष देशपांडे, पाटील यांच्या कन्या ज्योती राठोड आदी उपस्थित होते.

दिल्लीत होत असलेल्या संमेलनाविषयी माहिती देताना प्रा. मिलिंद जोशी म्हणाले, सुमारे ७० वर्षांपूर्वी दिल्लीत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या संमेलनाचे उद्घाटन तत्कालिन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते झाले होते तर स्वागताध्यक्ष बॅरिस्टर काकासाहेब गाडगीळ होते. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या अध्यक्षतेखाली दिल्लीतील संमेलन झाले होते. दिल्लीत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्याचा योग परत जुळून आला असून या संमेलनाचे स्वागताध्यक्षपद ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी स्वीकारले आहे. ज्येष्ठ लेखिका तारा भवाळकर यांच्या अध्यक्षतेखाली ९८वे संमेलन होत आहे.

प्रतिभाताई पाटील यांच्या ९०व्या वाढदिवसाचे औचित्य साधून प्रा. मिलिंद जोशी यांनी मसापने प्रकाशित केलेला अक्षरधन हा ग्रंथ भेट देऊन त्यांचा सन्मान केला. तर सरहदच्या वतीने काश्मीरी गब्बा देऊन शैलेश वाडेकर आणि अनुज नहार यांनी त्यांचा सन्मान केला. प्रतिभाताई पाटील यांच्या कुटुंबियांच्यावतीने पाटील यांच्यावरील गौरव ग्रंथ महाराष्ट्र साहित्य परिषद आणि सरहद संस्थेला भेट देण्यात आला.

संकेतस्थळाची निर्मिती करताना त्याची रचना साधी-सोपी आणि आकर्षक करण्यात आली आहे. संमेलनाविषयी अद्ययावत माहिती, प्रतिनिधी नोंदणी, ग्रंथ दालनाची नोंदणी या संकेतस्थळाद्वारे करता येणार आहे. तसेच मराठी भाषा, महाराष्ट्र आणि दिल्लीचे संबंध यावर प्रकाशझोत टाकणारी छायाचित्रे, व्हिडिओ क्लिप्स, पॉडकास्ट, न्यूज क्लिप्स पाहण्याची सोय आहे.विश्वकोश या विशेष विभागातून मराठी साहित्य आणि साहित्यिकांविषयी माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे. संकेतस्थळाच्या माध्यमातून जगभरातील कोट्यवधी मराठी लोकांपर्यंत या संमेलनाविषयीची माहिती पोहोचेल.

## गडकरी म्हणाले- महिला वाढल्या तर पुरुषांना २ बायका ठेवाव्या लागतील



**नवी दिल्ली :** केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी यांनी यूट्यूब पॉडकास्टमध्ये म्हटले आहे की, समाजात लिंग गुणोत्तराचा समतोल राखणे आवश्यक आहे. जर प्रत्येक १००० पुरुषांमागे १५०० स्त्रिया असतील तर पुरुषांना २ बायका ठेवण्याची परवानगी द्यावी लागेल.

बुधवारी प्रसारित झालेल्या या शोमध्ये गडकरी म्हणाले- लिव्ह-इन रिलेशनशिप ही संकल्पना चुकीची आहे आणि ती समाजाच्या नियमांच्या विरोधात आहे. समलिंगी विवाहामुळे समाजरचनाही नष्ट होईल.

गडकरी म्हणाले की, मुले जन्माला घालणे आणि त्यांचे योग्य पालनपोषण करणे हे पालकांचे कर्तव्य आहे. तुमच्याकडे मौजमजेसाठी मुलं आहेत आणि जबाबदारी घ्यायची नाही असं तुम्ही म्हणत असाल तर ते योग्य नाही.

गडकरी म्हणाले- एकदा मी लंडनमधील ब्रिटिश संसदेत गेलो होतो. यावेळी मी ब्रिटनचे पंतप्रधान आणि परराष्ट्र मंत्री यांना त्यांच्या देशासमोरील सर्वात मोठ्या समस्यांबद्दल विचारले होते. तेव्हा मला समजले की युरोपीय देशांतील सर्वात मोठी समस्या म्हणजे स्त्री-पुरुष विवाहात रस घेत नाहीत आणि लिव्ह इन रिलेशनशिपला प्राधान्य देतात.

२०११ च्या जनगणनेनुसार, भारतात दर १००० पुरुषांमागे ९४३ महिला आहेत. २०२१ च्या राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण-५ च्या अहवालानुसार, देशात दर १००० पुरुषांमागे १०२० महिला आहेत.

१. राजकारण हा अतृप्त आत्म्यांचा महासागर

गडकरी ३ डिसेंबर रोजी म्हणाले - राजकारण हा अतृप्त आत्म्यांचा महासागर आहे, जिथे प्रत्येक व्यक्ती दु:खी आहे आणि त्याच्या सध्याच्या पदापेक्षा उच्च पदाची आशा बाळगत आहे. जीवन हा तडजोडी, मजबुरी, मर्यादा आणि विरोधाभासांचा खेळ आहे. एखादी व्यक्ती कौटुंबिक, समाज, राजकारण किंवा कॉर्पोरेट जीवनात असो, जीवन आव्हाने आणि संकटांनी भरलेले असते.

२. भाजपकडे चांगले उत्पन्न देणारी पिके आहेत

१० नोव्हेंबर २०२४ रोजी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीदरम्यान नितीन गडकरी म्हणाले की भाजपचा विस्तार झपाट्याने होत आहे. पीक वाढले की त्यासोबत रोगही वाढतात. भाजपकडे भरपूर पीक आहेत, जे चांगले उत्पादन देतात, परंतु काही रोग देखील आणतात. त्यामुळे अशा आजारी पिकांवर कीटकनाशकांची फवारणी करावी लागते.

३. प्रेम आणि राजकारणात सर्व काही न्याय्य आहे

१० नोव्हेंबर रोजीच नितीन गडकरी म्हणाले होते की, प्रेम आणि राजकारणात सर्वकाही न्याय्य असते. कधी ते लोकांसाठी काम करते तर कधी प्रतिक्रिया येतात. शरद पवारांचा पक्ष फोडून अजित पवार महायुतीत दाखल झाले आहेत का, असा प्रश्न गडकरींना विचारण्यात आला.

४. सरकार हे विषकन्येसारखे, ज्याच्यासोबत जाते त्याला बुडवते

१ ऑक्टोबर २०२४ रोजी नितीन गडकरी महाराष्ट्राच्या विदर्भात गुंतवणुकीच्या कमतरतेबद्दल बोलताना म्हणाले, 'सर्व काही सरकारवर अवलंबून नसावे. माझे मत असे आहे की सत्तेत कोणताही पक्ष असो, सरकारला दूर ठेवा... सरकार हे विषकन्या आहे... ज्याच्या सोबत जाते त्याला बुडवते...'

५. राजा असा असावा की तो टीका सहन करू शकेल

नितीन गडकरी २० सप्टेंबर रोजी पुण्यातील एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीमध्ये पुस्तक प्रकाशन कार्यक्रमात म्हणाले होते की, राजा (शासक) असा असावा की त्याच्या विरोधात कोणी बोलले तर तो सहन करू शकेल. टीकेवर आत्मपरीक्षण करा. लोकशाहीची ही सर्वात मोठी कसोटी आहे.

## उदयनिधी स्टॅलिन म्हणाले - मला ख्रिश्चन असल्याचा अभिमान



**चेन्नई :** तामिळनाडूचे उपमुख्यमंत्री उदयनिधी स्टॅलिन यांनी बुधवारी कोईम्बतूर येथे ख्रिसमसच्या समारंभात सांगितले की, मला ख्रिश्चन असल्याचा अभिमान आहे. गेल्या वर्षी मी हे म्हटल्यावर अनेक संघी त्यावरून चिडले. पण आज मी त्याची पुनरावृत्ती करत आहे. मी सर्व धर्माचे प्रतिनिधीत्व करतो.

उदयनिधी म्हणाले की, जर तुम्हाला वाटत असेल की मी ख्रिश्चन आहे, तर मी आहे. मी मुस्लीम आहे असे तुम्हाला वाटत असेल तर मी मुस्लीम आहे. जर तुम्हाला वाटत असेल की मी हिंदू आहे, तर मी हिंदू आहे. मी सर्व धर्मांना मानतो. सर्व धर्म प्रेम करायला शिकवतात.

उदयनिधी यांनी भाजप-एआयएडीएमके धर्माचा राजकीय वापर करून घटनाविरोधी काम करत असल्याचा आरोप केला. धार्मिक भावना भडकावून द्वेष पसरवणाऱ्यांचा त्यांनी निषेध केला. ते म्हणाले, "अलीकडेच अलाहाबादच्या एका न्यायाधीशाने मुस्लिमांविरोधात प्रक्षोभक वक्तव्य केले होते. अशा व्यक्तीने न्यायाधीश राहावे का, असा प्रश्न आम्ही उपस्थित केला होता."

उदयनिधी म्हणाले की, लोकसभेत न्यायाधीशांना पदावरून हटवण्याच्या प्रस्तावावर काँग्रेस आणि द्रमुकने स्वाक्षरी केली, पण अण्णाद्रमुकच्या खासदारांनी त्यावर स्वाक्षरी केली नाही. एआयएडीएमकेने घटनाविरोधी न्यायाधीशाला हटवण्याच्या प्रस्तावाला पाठिंबा दिला नाही, कारण ते भाजपचे गुलाम बनले आहेत. भाजप आणि अण्णाद्रमुक यांच्यात अघोषित युती आहे.

उदयनिधी यांनी यापूर्वीही सनातन धर्माविरोधात वादग्रस्त विधान करून वाद निर्माण केला होता, त्यामुळे त्यांच्यावर अनेक गुन्हे दाखल आहेत. उदयनिधी स्टॅलिन यांनी २ सप्टेंबर २०२३ रोजी एका कार्यक्रमात सनातन धर्माला एक आजार म्हटले होते आणि ते नष्ट करण्याबाबत बोलले होते. त्यानंतर त्यांनी ७ सप्टेंबर रोजी स्पष्टीकरण दिले. ते म्हणाले होते, 'मी कोणत्याही धर्माचा शत्रू नाही. माझ्या विधानाचा चुकीचा अर्थ काढण्यात आला.

तेव्हा ते म्हणाले होते की, मी हिंदू धर्माच्या विरोधात नाही तर सनातन प्रथेच्या विरोधात आहे. तामिळनाडूमध्ये गेल्या १०० वर्षांपासून सनातन धर्माविरोधात आवाज उठवला जात आहे. आम्ही पुढची २०० वर्षे याविरोधात बोलत राहू. आंबेडकर आणि पेरियार यांनीही यापूर्वी अनेकदा याबद्दल बोलले आहेत.

उदयनिधी स्टॅलिन २३ मार्च रोजी पीएम मोदींवर राज्य सरकारला निधी वाटप करताना भेदभाव केल्याचा आरोप करण्यात आला होता. ते म्हणाले- PM ला २८ पैसे PM म्हटले पाहिजे. तामिळनाडू केंद्राने १ रुपया दिला तर केंद्र आम्हाला फक्त २८ पैसे परत करते.

उदयनिधी यांनी २० सप्टेंबर २०२३ रोजी नवीन संसद भवनाच्या उद्घाटन कार्यक्रमासाठी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना आमंत्रित न करण्याबाबत वादग्रस्त विधान केले होते. ते म्हणाले होते- राष्ट्रपती मुर्मू यांना बोलावले नाही कारण त्या विधवा आहेत आणि आदिवासी समाजातून आली आहे.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.

कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.

संपर्क क्र. 7588005002